प्रेस नोट

लातूर जिल्हा पोलीस भरती सन २०२४-२०२५

दिनांक १०.०३.२०२६

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस भरती सन २०२४-२०२५ च्या जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय पोलीस शिपाई यांची (३०) पदे भरण्यासाठी पहिल्या टप्यात उमेदवारांची **"शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणी"** ही दिनांक ११.०२.२०२६ ते २३.०२.२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात आली आहे.

पोलीस शिपाई पदासाठीच्या शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणीत उत्तीर्ण होवुन लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे गुणांची तात्पुरती गुणवत्ता यादी दिनांक २७.०२.२०२६ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात येवुन पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे.

पोलीस शिपाई पदासाठीच्या सदर गुणवत्ता यादीतील उमेदवारांची लेखी परीक्षा हि दिनांक १५.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवारांनी दिनांक १५.०३.२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी वेळेत हजर रहायचे आहे. सकाळी ०८.३० वा. नंतर उशिराने येणारे उमेदवारांना लेखी चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

-:: उमेदवारांना सुचना ::-

१. **उमेदवारांनी लेखी चाचणीसाठी येताना स्वत:चे प्रवेशपत्र (Hall Ticket) सोबत घेऊन यावे.**
२. **ओळखपत्र (उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेंस इ.) सोबत घेऊन यावे.**
३. **पासपोर्ट साईज २ फोटो सोबत घेऊन यावे.**
४. **कसल्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य, मोबाईल, बॅग, किंमती वस्तु घेऊन येण्यास बंदी राहील. आणल्यास ते कोठे ठेवायचे याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहिल.**

लातूर जिल्हा पोलीस शिपाई पदासाठीची लेखी चाचणी प्रक्रिया ही सी.सी.टि.व्हि. व व्हिडीओ ग्रॉफी च्या निघराणीखाली अतिशय तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शकरित्या घेण्यात येत असून उमेदवारांने कोणत्याही आमिषास व भुलथापांना बळी पडु नये, कोणाकडुन असे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब पोलीस अधीक्षक, लातूर, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.), लातूर व पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांना तात्काळ कळविण्यात यावी असे लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	मोबाईल क्रमांक/दुरध्वनी क्रमांक
०१	पोलीस अधीक्षक, लातूर (पोलीस भरती प्रमुख)	**९९२२१००७१२ (फक्त संदेश करावा)**
०२	अपर पोलीस अधीक्षक, लातूर	**९८२३९४०९५१**
०३	नियंत्रण कक्ष, लातूर	**०२३८२-२४२२९६**
०४	पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर	**०२३८२-२४२६७४**

तसेच **ई-मेल आयडी sp.latur@mahapolice.gov.in** वर सविस्तर आक्षेप नोंदविण्यात यावा.

अमोल श्री तांबे (भापोसे)
पोलीस अधीक्षक, लातूर

प्रति